**जॉर्डन, इथिओपिया व ओमानच्या भेटीपूर्वी पंतप्रधानांचे निवेदन**

15 डिसेंबर 2025

आज मी जॉर्डन, इथिओपिया आणि ओमान या तीन देशांना भेट देणार आहे, ज्यांच्याशी भारताचे प्राचीन सभ्यता कालीन तसेच व्यापक समकालीन द्विपक्षीय संबंध आहेत.

2. सर्वप्रथम मी, जॉर्डनचे राजा अब्दुल्ला द्वितीय बिन अल हुसैन यांच्या निमंत्रणावरून जॉर्डनला भेट देणार आहे. ही ऐतिहासिक भेट दोन्ही देशांमधील राजनैतिक संबंधांना 75 वर्षे पूर्ण झाल्याचे प्रतीक आहे. माझ्या भेटीदरम्यान, मी, जॉर्डनचे राजा अब्दुल्ला द्वितीय बिन अल हुसैन, जॉर्डनचे पंतप्रधान माननीय श्री. जफर हसन यांच्याशी तपशीलवार चर्चा करेन, आणि माननीय युवराज अल हुसैन बिन अब्दुल्ला द्वितीय यांच्याशीही चर्चा होण्याची आशा आहे. अम्मान येथे मी भारत-जॉर्डन संबंधांमध्ये महत्त्वाचे योगदान दिलेल्या तेथील उत्साही भारतीय समुदायाची सुद्धा भेट घेणार आहे.

3. अम्मान येथून मी, इथिओपियाचे पंतप्रधान माननीय डॉ. अबिय अहमद अली यांच्या निमंत्रणावरून इथिओपियाला प्रथमच भेट देणार आहे. ॲडिस अबाबा हे आफ्रिकन युनियनचे मुख्यालय देखील आहे. 2023 मध्ये, भारताच्या G20 अध्यक्षतेदरम्यान आफ्रिकन युनियनला G20 चे स्थायी सदस्य म्हणून सामावून घेण्यात आले होते. ॲडिस अबाबा मध्ये मी माननीय डॉ. अबिय अहमद अली यांच्याशी तपशीलवार चर्चा करेन आणि तेथे वास्तव्य करणाऱ्या परदेशस्थ भारतीयांशी संवाद साधण्याची संधी मला मिळणार आहे. त्याचसोबत, संसदेच्या संयुक्त सत्राला संबोधित करण्याचे भाग्यही मला लाभणार आहे, जेथे मी "लोकशाहीची जननी" म्हणून भारताचा प्रवास यावर आणि ग्लोबल साउथसाठी भारत-इथिओपिया भागीदारी किती महत्त्वाची आहे यावर माझे विचार व्यक्त करणार आहे.

4. माझ्या भेटीच्या अंतिम टप्प्यात, मी ओमानला भेट देणार आहे. भारत व ओमानच्या राजनैतिक संबंधांना 70 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने माझी ही भेट होत आहे. मस्कत मध्ये मी, ओमानचे सुल्तान यांच्याशी चर्चा करण्यास आणि आमची धोरणात्मक भागीदारी तसेच व्यावसायिक व आर्थिक संबंध बळकट करण्यास उत्सुक आहे. मी ओमानमधील परदेशस्थ भारतीय समुदायाशी देखील संवाद साधणार आहे, ज्यांनी देशाच्या विकासात आणि भारत–ओमान भागीदारी दृढ करण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

नवी दिल्ली

15 डिसेंबर 2025